नमुना-2

जाक्र/जिप/शिवि/प्रा-2/कावि/ 155 /023
शिक्षण विभाग (प्रा.) जिल्हा परिषद परभणी
दिनांक:- 09/01/2023.

**प्राति,**

**मुख्याध्यापक,**
**बोर्डीकर्स पोदार लर्न स्कुल माथला**
**ता. जिंतुर जि. परभणी.**

**विषय :- बालकांना मोफत वसक्ती च्या हक्क अधिनियम 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ बालकाना मोफत व सक्तीच्या शिक्षणा चाहक्कनियम,2011याच्या नियम पोटनियम(4)अन्वये शाळांना मान्यता प्रमाण पत्र देणे बाबत.**

**संदर्भ :- मुख्याध्यापक बोर्डीकर्स पोदार लर्न स्कुल माथला ता.जिंतुर जि. परभणी ज्यांचे पत्र क्रमांक 27 /023 दिनांक** 04/01/2023

मी शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद परभणी **दि.05/ 01/2022 ते दि. 04/01/2025. पर्यंत** तीन वर्षाच्या कालावधी साठी इयत्ता 01 ली ते 8 वी करिता **बोर्डीकर्स पोदार लर्न स्कुल माथला ता. जिंतुर जि. परभणी** या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरिल मान्यता ही खालील शर्ती च्या पुर्ततेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.**

1) मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवी नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
2) बालकांना मोफत वसक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2009 (जोडपत्र-1) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम 2011 (जोडपत्र-2) मधील तरतुदी चे शाळा पालन करील.
3) शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्ते सत्या इयत्ते ती लविद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादे पेक्षा प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होई पर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतू आणखी असेकी, पुर्वप्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
4) परिच्छेद 3 निर्विष्ट केलेल्या बालकां करिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपुर्ती मिळेल, अशी प्रतिपुर्ती शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
5) संस्था/ शाळा कोणतीही कॅपिटेशन फि वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दती साठी बालकांस किंवा त्याच्या किंवा मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पडणार नाही.
6) कोणत्याही बालकास वयाचा दाखला नाही म्हणुन शाळा प्रवेश नाकारणार नाही अथवा ,धर्म जात किंवा वंश, जन्म ठिकाण किंवा या पैकी कोणत्याही कारणास्तव ,शाळे मध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
7) (एक) शाळेत प्रवेश दिलेलया कोणत्याही पालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पुर्ण होई पर्यंत शाळेतुन काढुन टाकण्यात येणार नाही.
(दोन) कोणत्याही बालकास शारीरीक किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पुर्ण होई पर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
(चार) प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेल्या प्रत्येक बालकास नियम 23 अन्वये निर्धारीत केलेले प्रमाण पत्र देण्यात येईल.
(पाच) विकलांक /विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदी नुसार समावेश करण्यात येईल.
(सहा) अधिनियमाच्या कलम 23(1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणख असे की, अधिनियमाच्य प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.
(सात) अधिनियमाच्या कलम 24( 1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची /तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील आणि
(आठ) शिक्षकाने /शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामातस्वत: लागुंतवून घेऊ नये.याची सुनिश्चिती शाळा करील.

8) शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारीत केलेल्या अभ्यास क्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्य क्रमाचे पालन करील.

9) शाळा,अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहीत केल्या प्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

10) शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे प्रमाणांकाचे पालन करील. मागिल तपासणी च्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे होत्या. शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ एकुण बांधकाम क्षेत्रफळ वर्ग खोल्यांची संख्या कार्यालय-नि-भांडार-मुख्याध्यापकाची खोली मुलांसाठी व मुलीं साठी स्वतंत्र प्रसाधन गृह जेथे वापरण्यासाठी व प्रसाधन गृह स्वच्छ आणि आरोग्य दायी स्थितीत ठेवण्या साठी पुरेसे पाणी असेल. पिण्याच्या पाण्याची सुविधा दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाक घर अध्यापन, अध्ययन साहित्य/ खेळ व क्रिडा विषयक सामुग्री/ ग्रंथालययाची उपलब्धता वाचन साहित्य विनासायास उपलब्ध

11) मान्यता नसलेल्या वर्ग किंवा तुकड्या शाळे च्या नावाने परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

12) शाळेची इमारत किंवा इतर इमारत किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

13) शाळा,सोसायटी नोंदणी अधिनियम 1860(1860 या 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थे मार्फत चालवण्यात येत आहे.

14) शाळा कोणत्याही व्यक्तीच्या ,गटाच्या किंवा व्यक्ती संघाच्या किंवा इतर कोणत्याही सक्तीच्या फायद्या करीता किंवा कोणताही नफा मिळवण्यासाठी चालवण्यात येत आहे.

15) शाळेचे लेखे, सनदी लेखापाला कडून लेखा परिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमा नुसार योग्य लेखा विवरण पत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरण पत्रांची एक प्रत दर वर्षी जिल्हा शिक्षणाधिका-याकडे पाठविण्यात यावी.

16) तुमच्या शाळेला मिळालेला युडायस नंबर 27170801702 **हा** आहे. या कार्यालयाशी कोणताही पत्र व्यवहार करताना तो नमूद करावा. याची नोंद घ्यावी. शिक्षण/संचालक जिल्हा शिक्षणाधिकारी वेळो वेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यते च्या शर्ती ची निरंतर पुर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटीदुर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकर देईल अशा सुचनांचे पालन करावे.

17) संस्थेच्या नोंदणी चे कोणतेही असल्यास नुतनी करण केल्याची सुनिश्चिती करावी.

18) जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती या सोबत जोडल्या आहेत.

शिक्षणाधिकारी(प्रा.)
जिल्हापरिषदपरभणी.